Contemporary Research in India (ISSN 2231-2137): UGC Approved Journal No. 62441 - NAAS Score 2018: 3.23

CONTEMPORARY RESEARCH IN INDIA
ISSN 2231 - 2137

# संत साहित्याची सार्वकालिकता

डॉ. दत्तात्रय महादेव डांगे व डॉ. विद्या विजय नावडकर
डी. पी. भोसले कॉलेज, कोरेगाव, ता. कोरेगाव, जि. सातारा. (महाराष्ट्र)

Received: 17/12/2017 | Edited: 25/12/2017 | Accepted & Published: 03/03/2018

गोषवारा

'संत साहित्याची सार्वकालिकता' या संदर्भात संत साहित्याचा विचार करीत असताना तेराव्या शतकापासून सतराव्या शतकाप महाराष्ट्रात लोकोत्तर व्यक्तिमत्त्वांची परंपरा निर्माण झाली यातून संत साहित्य हे काळाच्या संदर्भात व्यापक ठरताना दिसते. भक्तीच्या क्षेत्रा असलेली कुळ, जाती, वर्ण श्रेष्ठत्वाची भावना संत साहित्याने फोल ठरवून दिलेली दिसते. समाजजीवनात कर्मकांडाच्या अवडंबराने धर्मव्यवस्थे ग्लानी प्राप्त झालेली होती. लोकांच्या वृत्तीतून आचारधर्म, मानवता व धर्माबाबतची धारणा चुकीची बनली होती. लोकांमध्ये ज्ञान व सहिष्णु निर्माण करण्यात संत साहित्य यशस्वी झालेले दिसते. महाराष्ट्रातील एका फार मोठ्या समूहमनावर समर्थपणे प्रभाव पाडताना दिसून ये त्यातूनच आजच्या एकविसाव्या शतकात देखील औद्योगिकीकरणाचा प्रभाव वाढला असताना देखील लोकांना सदविचार व सदवर्तनास प्रवृ करण्याचे काम संत साहित्य मोठ्या प्रमाणावर करते आहे. म्हणून संत साहित्याने दिलेले विचार मानवी मनावर प्रभावीपणे अंमल करतात. या संत साहित्य हे कालातीत असल्याचे सिध्द होते.

## प्रास्ताविक

मध्ययुगीन कालखंडामध्ये मराठीत जे साहित्य निर्माण झाले ते धर्मपंथांच्या प्रेरणेतून निर्माण झालेले दिसते. स्वाभाविक आपल्या धर्मपंथाची विचारसरणी समाजमनाला पटवून देणे या अंगांनेच साहित्य निर्माण झालेले दिसते. ज्ञानेश्वरांसारख्या संत कवीने आपल्या प्रतिभेविषयी आत्मविश्वासाचे उद्गार काढले असले तरी इतर संत कवींनी आपल्या पारमार्थिक भावना व विचारांच्या प्रकटीकरणाचे साधन एवढ्याच दृष्टीकोनातून साहित्याकडे पाहिलेले दिसते. दैवी प्रतिभेच्या योगी ज्ञानेश्वरांचा प्रकट झालेला भावनाविष्कार, नामदेव, एकनाथ तसेच संत तुकाराम यांच्या काव्यातील उत्कट आविष्कार यामुळेच या लेखनाला अक्षर वाङ्मयाची झळाळी प्राप्त झालेली दिसते. त्यानी लिहिलेले तात्त्विक स्वरुपाचे भाष्य, पारमार्थिक तळमळीने उत्कट झालेल्या आत्मपर रचना, रसवर्णनांनी सजलेली अख्यानरचना यांमुळेच संतसाहित्य आपल्या वाङ्मय गुणांच्या बळावर आज इतकी वर्षे जनमनावर पकड ठेऊन असल्याचे दिसते.

सर्व संतांनी परमेश्वर प्राप्ती करुन देणे. हेच साहित्याचे श्रेष्ठत्त्व मानलेले दिसते. 'परतत्त्वस्पर्श'हाच या साहित्याचा केंद्रबिंदू असलेला दिसतो. आत्मज्ञानाचा शोध घेण्याच्या प्रयत्नातून संतांची आत्मपर कविता जन्माला आलेली दिसते. तर संत ज्ञानेश्वरांसारख्या संताने 'भगवतगीते'च्या आधारे स्वभाषेत स्वतंत्रपणे परमेश्वर प्राप्तीच्या मार्गाचे तात्त्विक निरुपण केलेले आहे.

## वारकरी संप्रदाय

तेराव्या शतकाच्या सुरुवातीला महाराष्ट्रात 'वारकरी संप्रदाय' सुरु झाल्याचे मानले जाते. तत्कालिन कालखंडात वारकरी संप्रदाय पूर्व समाजात महानुभाव, नाथ, शक्ती आदी संप्रदाय अस्तित्वात होते. मात्र सदरचे संप्रदाय लोकांमधील आध्यात्माची भूक भागविण्यास कांही अंशी कमी पडल्याने या नव्या संप्रदाया लोकांचा ओढ वाढला. नाथ संप्रदायात असलेली प्रचंड शारी पिडण, महानुभाव संप्रदायात असलेली टोकाची विरक्ती या पातळी संत साहित्याने 'धर्माचे तत्त्वज्ञान' अधिक सुकर करुन सांगि पंढरपूरचा विठोबा, विठ्ठल किंवा पांडुरंग हे वारकरी संप्रदाय आराध्य दैवत बनले. विठोबा हा देव साधा, भाविकांच्या हाकेला स धावणारा, कोणत्याही नवस सायासाशिवाय त्यांच्या आशा आक फलद्रुप करणारा, भक्तीच्या क्षेत्रात लोकांचे मनोरथ पुरविणारा हा देव 'वारकरी संप्रदाया'चा लोकदेव बनला. संत बहिणाब 'ज्ञानदेवे रचला पाया | ऊभारले देवालया |' या अभंगातून ज्ञान कालखंडापासून 'वारकरी संप्रदाय' प्रभावी बनलेला दिसतो.

## वारकरी संप्रदायाचा आचारधर्म

वारकरी संप्रदायाने भक्तीला प्राधान्य देवून आध्यात्मा अवडंबर नष्ट करण्याचा प्रयत्न केला. पंढरपूरची वर्षातून किमान वारी, चंद्रभागेचे स्नान, एकादशीचा उपवास, गळयात तुळशीची म कपाळी गंध, हातात टाळ, मुखात भगवंताचे नाम, विठोबाचे इतक्या सहजपणे 'वारकरी संप्रदायाने' आचारधर्म निर्माण केला. मांस, व्यसन याला प्रतिबंध केला. परनारी त्याग, वासना विका संयम, संतांची संगत, दुष्टांचे निर्दालन अशा प्रकाराने वार आचारधर्म निर्माण झालेला दिसतो. वारकरी संप्रदायाने हिंदू ध निर्माण झालेली पुरोहितशाही नष्ट करुन देव व भक्त यांच्याम संबंध थेट स्वरुपात निर्माण केले. त्यामुळे भक्तीच्या क्षेत्रात जाती, व वर्ण यांचे श्रेष्ठत्त्व नाकारले.

## वारकरी संप्रदायाचे तत्त्वज्ञान

वारकरी संप्रदाय हा भक्तिमार्गी असल्यामुळे तत्त्वज्ञान उभारणी तीन मुलभूत प्रश्नांवर झालेली आहे. ज्याची भक्ती कराव

राचे स्वरुप, ज्याने भक्ती करावयाची त्या जीवाचे स्वरुप व रावयाची तिचे स्वरुप, हे तीन प्रश्न होत. ह्या प्रश्नांच्या जे ज्ञान होईल, ते म्हणजे संप्रदायाचे तत्त्वज्ञान होय. दायाचे लोकदैवत विठ्ठल असल्याने, त्याला मानणारा वर्ग असल्याने साधे, सहज व सोपे तत्त्वज्ञान निर्माण होणे ही म्हणून वारकरी संप्रदायाने भक्तीच्या क्षेत्रात महत्त्वाची वल्याचे दिसते. 'विष्णूमय जग, वैष्णवांचा धर्म, भेदाभेद ' ही वारकरी पंथाची शिकवण आपणास त्यांचे तत्त्वज्ञान ते. 'जे जे भेटे भूत, ते ते मानिजे भगवंत' ही वारकरी महत्वाची भूमिका राहिली आहे.

रकरी संप्रदाय हा अवैदिक परंपरा मानणारा आहे. वेदाचे 'मोक्षा'ला प्राधान्य देणारे राहिले आहे. मात्र संत विचार हे भक्तीला प्राधान्य देणारे ठरले आहेत. ज्ञानेश्वर, नाथ, तुकाराम आदी संतांनी हे तत्त्वज्ञान निर्माण केले केंद्रबिंदू मानून हे तत्त्वज्ञान तयार झाले आहे. भक्तिसाठी व हवा. निष्काम भावनेने केलेली भक्ती माणसाला मोक्ष . वा.करी तत्त्वज्ञानातील 'मोक्ष' ही संकल्पना स्वर्ग प्राप्ती हून भिन्न आहे. या संदर्भात डॉ. स.रा. गाडगीळ यांनी चार महत्वाचा वाटतो, "मध्ययुगाच्या आसपास संपूर्ण रनिराळ्या संप्रदायांच्या नावाखाली भक्तिआंदोलने सुरु ळतात. वैदिक धर्माच्या कठोर, संकुचित बंधनातून आणि हणी कर्मकांडांच्या प्रभावातून मानवी मनाला मुक्त प्रयत्न दिसतो." १ स्वर्ग प्राप्तीच्या वल्गनांना वारकरी फोल ठरविले आहे. 'धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष' या चार तथ्यांना वारकरी संप्रदायाने वेगळयास्वरुपाचे आयाम दिले आहेत. पूर्वजन्म आणि पूनर्जन्म या संकल्पनांना दायाने डोळसपणाने स्विकारले आहे. स्वर्गप्राप्तीसाठी स्थेने निर्माण केलेल्या कर्मकांडाला वारकरी संप्रदायाने आध्यात्माच्या क्षेत्रातील सत्य ज्ञान मिळविण्याचे सोपे र्माण केले आहे.

श्रेष्ठत्व

मावरुन श्रेष्ठ-कनिष्ठता ठरविता येत नाही, तर ती कर्माने हेजे. म्हणूनच संत तुकाराम आपल्या कुणबी जातीतील समाधान व्यक्त करतात. तर संत चोखामेळा 'ऊस डोंगा, न्हे डोंगा, काय भुललासी वरलीया रंगा' या अभंगातून अहंकार व दंभ बाळगणाऱ्या उच्च वर्णिय लोकांना त. माणसाला पापाचरणासाठी प्रवृत्त करणारे षडरिपु भूत मानले. काम, क्रोध, लोभ, मोह, मत्सर व माया या द्वर्तनापासून दूर ठेवतात. म्हणून या बाबींना जीवनात गण्याविषयी संत मार्गदर्शन करतात. 'ब्राम्हण' हा वर्ण न पध्दतीत श्रेष्ठ मानला गेला असल्याने इतर लोकांना चतेने वागविले जात असे. माणसाने कोणत्या कुळात . हे माणसाच्या हातात नसते. परंतु येथील व्यवस्थेने र्वजन्माचे सुकृत जोडून, पाप-पुण्याचे अवडंबर माजविले.

माणसांचा जन्म हा पंचमहाभुतांच्या संयोगातून होत असतो. आप, तेज, वायु, पृथ्वी व आकाश ही ती पाच तत्त्वे होत. हा संतांनी दिलेला विचार आहे. जीव जन्माला येतो आणि मृत्यू पावतो. ही निसर्गातील सातत्याने घडणारी घटना असते. माणूस हा निर्सगाचेच आपत्य आहे. परंतु माणसांच्यात जाती व धर्म या बाबींची निर्मिती करुन श्रेष्ठ-कनिष्ठता हा भाव चूकीचा ठरविला गेला आहे. म्हणून संतांनी श्रेष्ठ-कनिष्ठतेला विरोध केला आहे.

तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी असणाऱ्या नद्या पवित्र असतात. ही भावना तेथील महती वाढविण्यासाठी आपण समजू शकतो. मात्र नद्यांची पवित्रता ही पापक्षालनाला मदत करणारी आहे. ही बाब ब्राम्हणत्व वाढवायला मदत करणारी ठरली. माणसाच्या हातून घडणारे पाप हे तीर्थक्षेत्रातील नद्याच्या पाण्यानी धूतल्या जावू शकते. हा विचार ब्राम्हणी स्तोम वाढविणारे होते. म्हणून संतांनी या प्रकारच्या विचारातील फोलपणा दाखवून दिला. संत तुकारामांनी 'तिर्थी धोंडा पाणी| देव रोकडा सज्जनी |'२ या सारख्या अभंगातून ब्राम्हणी व्यवस्थेवर कोरडे ओढले आहेत. अनेक तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी देवदैवतांच्या नावावर सामान्यांची फसवणूक होत असते. हे सार्वकालिक सत्य संतांनी जाणले होते. म्हणूनच तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी चालणारी ही फसवणूक रोखण्यासाठी संतांनी कठोर शब्दात अभंगांची रचना केलेली दिसते. मंदिरे ही संस्काराची व सदविचाराची केंद्रे असावीत. त्यातून प्रबोधनाचा विचार सर्वदूर पसरावा. ही संतांची अपेक्षा होती. मात्र प्रत्यक्षात मंदिरांमधून लोकांचे शोषण फार मोठ्या प्रमाणात होत असते. हे संतांनी जाणले. देव हा मंदिरात नसतो. तो दगडाच्या मूर्तीत ही नसतो. तो तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी असत नाही. तर तो सर्वदूर चराचरामध्ये वसलेला आहे. प्रत्येक जीवाच्या ठिकाणी तो वसलेला आहे. त्याला ओळखण्याची दृष्टी आपण विकसित केली पाहिजे. हा विचार संतांनी दिला. 'जे जे भेटे भूत | ते ते मानिजे भगवंत| हा भक्तीयोग निश्चित| जाण माझा '३ सर्व सजिवांच्या ठायी परमेश्वराचे अस्तित्त्व आहे. ही व्यापक दृष्टी देण्यामध्ये संत यशस्वी झालेले दिसतात.

आज एकविसाव्या शतकात माहिती आणि तंत्रज्ञानाने एवढी प्रगती करुन देखील देववाद व दैववादाचे स्तोम वाढलेलेच दिसते. आजच्या औद्योगिकीकरणाच्या प्रक्रियेत सर्व जग जवळ आलेले आहे. माणूस भौतिक सुखाच्या मागे धावतो आहे. त्याला उपभोगण्यासाठी सर्व प्रकारची सुखे उपलब्ध आहेत. तो चंगळवादाला प्राधान्य देताना दिसतो. सुखासीनता वाढल्यामुळे त्याच्यातील पाशवी वृत्ती प्रबळ होताना दिसते. या पातळीवर विचार केला तर संतांनी दिलेला विचार हा सार्वकालिक उपयुक्त ठरताना दिसतो. सुखाची भावना ही भावनिक पातळीवरची आहे. केवळ उपभोगाने सुखाचा आनंद न घेता तो मानसिक पातळीवर घेतला तर त्याला चिरंतन मूल्य प्राप्त होवू शकते. हा संतविचार माणसाला संयम व सुख प्राप्त करुन देणारा आहे.

वारकरी संप्रदायाचा भागवत धर्म सर्वांना ममत्वानेजवळ करणारा होता. उपासनेसाठही साध्या सोप्या नामस्मरणाचा पुरस्कार केला. 'भक्तीच्या क्षेत्रात कुल, जाती, वर्ण यांचा विचार नगण्य असून

तेथे व्यक्तिच्या भक्तीभावाला महत्त्व आहे.' भक्तिमार्गी व्यक्तीचे कर्मकांडाचे अवडंबर न माजवता सदाचार संपन्न अशा जीवनाच्या आधाराने निष्काम भक्तीची आराधना करणे अवश्य आहे आणि अन्य उपासनापंथ किंवा उपास्य-दैवते यांच्याविषयी सहिष्णूता बाळगणे अशी ही तीन वैशिष्ट्ये आहेत.[४] ही तीनही वैशिष्टये मानवाच्या वर्तमान व भविष्यासाठी निश्चित उपयुक्त ठरणारी आहेत. व्यक्तीची योग्यता त्याच्या धर्माविरुन ठरत नसून ती गुणांवर ठरणारी पाहिजे. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्ती त्या कितीही मोठ्या असोत त्या चारित्र्यसंपन्न असणे गरजेचे आहेत. आपल्या मतांविषयी निष्ठा बाळगुणही इतरांच्या मनाचा सहिष्णुवृत्तीने विचार करणे शक्य आहे.[५] असे मत मु. श्री. कानडे यांनी मांडलेले आहे. अशा पध्दतीने वारकरी संतांचा सर्वसमावेशक भागवतधर्म आजच्या सार्वकालिक निश्चितच मार्गदर्शक आहे.

सर्व संतांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून पारमार्थिक समानतेची संकल्पना मांडली. त्या प्रभावामुळे चातुर्वण्याधिष्ठित समाजरचना जरी खिळखिळी झाली नसली तरी देखील समाजातील विषमता कमी होण्यास मात्र निश्चित मदत झाली. दासीपणाचे जनाबाईचे दु:ख, चोखामेळा व कर्ममेळा यांचे विचार त्यांच्या अभंगातून व्यक्त झाले. चोखोबांच्या अस्थी नामदेवांनी मंगळवेढ्याहून आणल्या. एकनाथांनी अस्पृश्य मुलाला प्रेमाने कडेवर घेतले. एकूणच संताचा हा भक्तिक्षेत्रातील समतेचा विचार हा एकमानवतावाद होता. भक्तिक्षेत्रातील हा मानवतावाद वर्तमान व भविष्यासाठी उपयोगी ठरतो.

यादवकाळापासून आजपर्यंत महाराष्ट्राचा सामाजिक व राजकिय इतिहास लक्षात घेतला तर अमुलाग्र स्वरुपाचे बदल व स्थित्यंतरे या कालखंडात झालेली दिसून येतात. या प्रदीर्घ कालखंडात ज्ञानेश्वर – तुकाराम – नामदेव – एकनाथ व इतर संतांचा जनमानसावर व एकूणच व्यवस्थेवर असलेला दिसून येतो. पंढरपूरची वारी मोठ्या भाविकभक्तीने भरताना दिसते. लाख यामध्ये सहभागी होतात. आळंदी पासून पंढरपूर पर्यंत ऊ पाऊस यांची तमा न बाळगता लोक वारीत सहभागी होतात कनिष्ठ, गरीब-श्रीमंत, स्त्री-पुरुष, शिक्षीत-अशिक्षीत, लहान-मोठ कोणताही भेदाभेद न करता केवळ वारकरी या एकाच नात्याने हा प्रवास सुरु असतो. 'ज्ञानेश्वर माऊली तुकाराम', 'जय जय राम हारी', 'विठोबा रुक्माई', 'निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान, मुक्त एकनाथ, नामदेव, तुकाराम' अशा नामघोषांनी लाखो लोक सहभागी होत असतात. संत साहित्यातील विचार हे माण सुखाचा आनंद मिळवून देण्यात यशस्वी ठरताना दिसतात. म्ह त्यांच्या साहित्यातील व विचारातील अमृतकण शोधून पिढीसमोर ठेवले तर हे साहित्य सार्वकालिक उपयुक्त ठरते.

**निष्कर्ष**

1. मध्ययुगीन कालखंडात धर्मप्रेरणेतून साहित्याची निर्मिती झा दिसून येते.
2. संतसाहित्याचे शाश्वत व कालसापेक्ष असे दोन पैलू अ दिसतात.
3. संत साहित्यातील सामाजिक समतेच्या मांडणीमुळे विषमता होण्यास मदत झाली. त्याचा हा मानवतावादी दृष्टीकोण आ मार्गदर्शक आहे.
4. संतांनी दिलेला विचार हा 'भक्ती'भावनेला प्राधान्य देणारा ठर
5. संतांचा विचार वैदिक परंपरेहून भिन्न स्वरुपाचा आहे.
6. संत साहित्याची उपयुक्तता ही सार्वकालिक असल्याचे दिसते.

**संदर्भ**

१. गाडगीळ स. रा. 'ज्ञानेश्वर प्रणीत भक्तियोग (भूमिका), दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे, आवृत्ती १९७९, पृ. क्र. १७.

२. तुकारामाची गाथा, अभंग ८९

३. ज्ञानेश्वरी, अध्याय दहावा, ओवी क्र. ११८

४. कानडे मु. श्री., 'संताची हे भेटी', स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे., प्रथम आवृत्ती एप्रिल १९९१, पृ. क. २३३.

५. तत्रैव, पृ. क्र. २३४.